26-06-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/26/2025 12:10 AM Page 1

भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा इंग्लंडवर दणदणीत विजय

लॉफबरो (इंग्लंड), दि. २५ :

इंग्लंड दौऱ्यावर असलेल्या भारताच्या १९ वर्षांखालील संघाने मंगळवारी एक जबरदस्त प्रदर्शन करत इंग्लंड यंग लायन्सचा २३१ धावांनी पराभव केला. लॉफबरो येथे झालेल्या टूर मॅचमध्ये भारतीय संघाने केवळ ५० षटकांत ४४२ धावांचा डोंगर उभारला. या विजयात सर्वाधिक लक्ष वेधून घेतले ते गुजरातमधील गांधीधाम येथून आलेल्या यष्टीरक्षक-फलंदाज हरवंश पंगालियाने. त्याने अवघ्या ५२ चेंडूत नाबाद १०३ धावा फटकावत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

या सामन्याचे वैशिष्ट्य म्हणजे आयपीएलमध्ये चमकदार कामगिरी करणारे खेळाडू संघात असतानाही, विजयाचे शिल्पकार ठरले ते अप्रतिक्षित चेहरे. भारताकडून आयपीएल स्टार्स आयुष म्हात्रे आणि वैभव सूर्यवंशी अपयशी ठरले. म्हात्रे अवघ्या १ धावावर माघारी परतला, तर १४ वर्षीय सूर्यवंशीने केवळ १७ धावा केल्या.

हरवंश पंगालियाची शतकी खेळी प्रकाशझोतात

भारताच्या डावाची सुरुवात झपाट्याने झाली. हरवंश पंगालियाने आपल्या खेळीत ८ चौकार आणि ९ षटकार ठोकले. त्याला राहुल कुमारची ६० चेंडूत ७३ धावांची, तर कनिष्क चौहानची ६७ चेंडूत ७९ धावांची उत्तम साथ लाभली. आर.एस. अम्ब्रीशने देखील आक्रमक खेळ करत ४७ चेंडूत ७२ धावा केल्या.

गोलंदाजीत दीपेश देवेंद्रनने प्रभावी कामगिरी करत ३ बळी घेतले. त्याला नमन पुष्पक आणि विहान मल्होत्राने प्रत्येकी २ विकेट्स मिळवून साथ दिली. फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांत भारताच्या १९ वर्षांखालील संघाने वर्चस्व राखत मालिकेचा पहिला सामना सहज जिंकला.

हरवंश पंगालियाच्या खेळीमुळे अनेकांचे लक्ष त्याच्याकडे वेधले गेले आहे. मूळचा गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील गांधीधामचा रहिवासी असलेला हरवंश सध्या श्री. नकुल अयाची यांच्या मार्गदर्शनाखाली नीलकंठ क्रिकेट अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत आहे. विशेष म्हणजे त्याचे कुटुंब सध्या कॅनडाच्या ब्रॅम्प्टन शहरात स्थायिक आहे आणि त्याचे वडील ट्रक चालक म्हणून काम करत आहेत.

आयपीएलमध्ये झळकलेले काही खेळाडू सामन्यात अपेक्षेप्रमाणे चमकू शकले नसले, तरीही या युवा भारतीय संघाने एकत्रित खेळ दाखवत इंग्लंडमध्ये आपली ताकद सिद्ध केली आहे. हरवंशसारखा नवोदित खेळाडू भविष्यात भारतीय क्रिकेटसाठी महत्त्वाचा ठरू शकतो, हे त्याच्या प्रदर्शनाने अधोरेखित केले आहे.

१९८३ च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघास सचिन तेंडुलकरकडून नमन !

मुंबई, दि. २५ :

२५ जून १९८३ ! भारतीय क्रिकेटसाठी इतिहासाचा एक सुवर्णक्षण. कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली भारताने इंग्लंडच्या लॉर्ड्स मैदानावर वेस्ट इंडिजसारख्या बलाढ्य संघाला हरवून पहिल्यांदा क्रिकेट विश्वचषक उचलला. बुधवारी या ऐतिहासिक विजयाला ४२ वर्षे पूर्ण झाली . यानिमित्ताने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने हा क्षण आठवत आपल्या बालपणाच्या आठवणींना उजाळा दिला.

सचिनने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (पूर्वीचे ट्विटर) वर लिहिले की , १९८३ मध्ये आजच्याच दिवशी भारताने विश्वचषक जिंकला तेव्हा मी फक्त १० वर्षांचा होतो. त्या क्षणाने एक स्वप्न उजाडले आणि ते स्वप्न माझा प्रवास बनला.

भारतीय क्रिकेटला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय नकाशावर आणणाऱ्या त्या विजयानंतर देशात क्रिकेट ही एक भावना बनली. भारताने त्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत १८३ धावा केल्या होत्या. वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांपैकी अँडी रॉबर्ट्स, माल्कम मार्शल, मायकेल होल्डिंग आणि जोएल गार्नर यांसारख्या धडाडीच्या खेळाडूंनी भारताला रोखले. मात्र, भारताच्या गोलंदाजांनी प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजचा डाव १४० धावांत गुंडाळत ४३ धावांनी विजय साकारला.

१९८३ चा हा विजय केवळ ट्रॉफी मिळवण्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्याने भारतीय क्रिकेटमधील आत्मविश्वास वाढवला. क्रिकेट एक शहरी खेळ न राहता गावखेड्यांपर्यंत पोहोचला. या विजयामुळे अनेक नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळाली, ज्यात लहानगा सचिन तेंडुलकरदेखील होता, ज्याने पुढे भारतीय क्रिकेटचा चेहरा बदलला.

माजी कर्णधार सौरव गांगुली याने देखील अलीकडील एका पॉडकास्टमध्ये पीटीआयला सांगितले होते की , लॉर्ड्समध्ये कपिल देव, संधू, मदन लाल, रॉजर बिन्नी, संदीप पाटील यांना पाहणे खूप मोठी गोष्ट होती. १९८३ हा काळ खूप मोठा होता. त्यामुळे आम्हाला क्रिकेट खेळण्याची खूप प्रेरणा मिळाली.

या विजयानंतर बीसीसीआयकडे खेळाडूंना सन्मानित करण्यासाठी पुरेसा निधी नव्हता. त्यावेळी भारतीय संगीत क्षेत्रातील महान गायिका लता मंगेशकर पुढे आल्या. त्यांचे जवळचे मित्र आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष राज सिंग डुंगरपूर यांनी त्यांच्याशी संपर्क साधून दिल्लीतील एका संगीत कार्यक्रमात सादरीकरण करण्याची विनंती केली. या कार्यक्रमातून जमलेल्या निधीच्या आधारे विजयी संघातील प्रत्येक खेळाडूला दोन लाख रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले.कृतज्ञतेच्या प्रतीकस्वरूप, बीसीसीआयने लता मंगेशकर यांना त्यांच्या मृत्यूपर्यंत देशात होणाऱ्या कोणत्याही सामन्यासाठी दोन व्हीआयपी तिकिटे उपलब्ध करून दिली होती.

१९८३ चा विश्वविजय केवळ क्रीडा क्षेत्रापुरता मर्यादित नव्हता. तो भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक आत्मभानाचा भाग बनला. या विजयानंतर देशभरात नव्या आशा, नव्या आकांक्षा जागृत झाल्या. आणि अशा या प्रेरणादायी क्षणाच्या आठवणीतूनच एक १० वर्षांचा मुलगा क्रिकेटचा देव बनला तो म्हणजे सचिन रमेश तेंडुलकर.

मेस्सी आणि इंटर मियामीची पीएसजीविरुद्ध लढत

अटलांटा, दि. २५ :

इंटर मियामीचा प्रशिक्षक जेवियर मास्चेरानो यांना आशा आहे की लिओनेल मेस्सीच्या पॅरिस सेंट-जर्मेनमधील (पीएसजी) असमाधानी आठवणी त्याला क्लब वर्ल्ड कपमधील आगामी सामन्यात प्रेरणा देतील. रविवारी मियामी आणि पीएसजीमध्ये होणाऱ्या सामन्यात अनेक जुन्या सहकाऱ्यांचे पुन्हा एकदा आमने-सामने होणार आहे.

लीग १ क्लब पीएसजीमधील दोन निराशाजनक हंगामांनंतर मेस्सीने अमेरिकेतील इंटर मियामीमध्ये प्रवेश केला. मेजर लीग सॉकरमध्ये पदार्पण केल्यानंतर मेस्सीने यापूर्वी खुल्या शब्दांत सांगितले होते की, पीएसजीमध्ये मी आनंदी नव्हतो, प्रशिक्षण आणि खेळ यांच्यात एकरूपता वाटत नव्हती.

रविवारीच्या सामन्यासाठी मास्चेरानो यांनी व्यक्त केले की, तो जर रागावलेला असेल, तर ते आमच्यासाठी चांगले ठरेल. कारण मेस्सी अशा खेळाडूंपैकी आहे की जेव्हा त्याच्या मनात काहीतरी असते, तेव्हा तो त्याच्या खेळात अधिक देतो.मास्चेरानो म्हणाले की, मेस्सी आणि पीएसजी यांच्यातील दुरावा हा आता भूतकाळात गेला आहे आणि अमेरिका हे त्यांच्यासाठी एक वेगळं वातावरण ठरेल. आम्ही एक उत्तम खेळ खेळण्याचा प्रयत्न करू. त्यासाठी आम्हाला परिपूर्ण सादरीकरण करावं लागेल, असे ते म्हणाले.

इंटर मियामीने ग्रुप ए मधून पाल्मेरास आणि अल अहली यांच्याविरुद्ध बरोबरी साधत आणि पोर्तोचा पराभव करत आश्चर्यकारकपणे पात्रता फेरी गाठली आहे. त्यांच्यासमोर आता युरोपियन चॅम्पियन पीएसजीचे आव्हान आहे.

पीएसजीच्या सध्याच्या प्रशिक्षकपदी लुईस एनरिक आहेत, जे यापूर्वी बार्सिलोना संघाचे प्रशिक्षक होते. त्यांच्याच नेतृत्वाखाली २०१५ साली मेस्सी, लुईस सुआरेझ, सर्जिओ बुस्केट्स, जॉर्डी अल्बा आणि मास्चेरानो यांनी बार्सिलोनाला तिहेरी विजेतेपद मिळवून दिलं होतं.

अल्बा म्हणतो, लुईस एनरिकसारखा दुसरा प्रशिक्षक नाही. फक्त मैदानावरच नव्हे, तर गटव्यवस्थापनातही तो उत्कृष्ट आहे. त्याच्याशी पुन्हा भेट होईल याचं मला समाधान आहे, पण सुरुवातीची शिट्टी वाजल्यावर आमचा उद्देश त्याला हरवण्याचा असेल.

सुआरेझनेही एनरिकच्या कार्यपद्धतीचं कौतुक करताना सांगितले की , माझ्या कारकिर्दीत प्रशिक्षक ऑस्कर तबारेझ आणि लुईस एनरिक हे दोन सर्वात प्रभावी मार्गदर्शक ठरले. त्यांनी मला अशा भूमिका शिकवल्या ज्या मला पूर्वी मान्य नव्हत्या . म्हणजे चेंडूशिवाय हालचाल, सामूहिक विचार वगैरे .

क्लब कोचिंगमध्ये पदार्पण करणाऱ्या मास्चेरानो यांनी मान्य केलं की, एनरिक त्यांचा वैयक्तिक मित्र आहे. फुटबॉलचं हेच वैशिष्ट्य आहे . अशा संधी येतात. मी अजून प्रशिक्षक म्हणून पूर्णपणे पात्र आहे असं म्हणणार नाही, पण ही एक सुंदर संधी आहे, असं त्यांनी नम्रपणे सांगितलं.

मात्र, रविवारी नात्यांपेक्षा सामना जिंकण्याचे महत्त्व अधिक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मी त्याला शुभेच्छा देतो, पण रविवारी नाही. त्या दिवशी नशीब आमच्या बाजूने असावं हीच इच्छा, असे मास्चेरानो म्हणाले.

ही लढत केवळ क्लब वर्ल्ड कपमधील एक महत्त्वाचा सामना नसून, ती जुन्या सहकाऱ्यांमधील मैत्री, व्यावसायिक स्पर्धा आणि वैयक्तिक प्रेरणांची चाचणी आहे. पॅरिसमधील आठवणी, बार्सिलोनाच्या गौरवशाली काळातील अनुभव, आणि अमेरिकेतील नव्याने सुरू झालेला अध्याय . मेस्सीच्या कारकिर्दीतला हा टप्पा अनेक पातळ्यांवर ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे.

भारताच्या २०३० राष्ट्रकुल स्पर्धा यजमानपदाच्या आशा उजळल्या

नवी दिल्ली, दि. २५ :

२०३० राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे यजमानपद मिळविण्याच्या शर्यतीत भारताला महत्त्वाची चालना मिळाली आहे. कारण, या शर्यतीतील एक प्रमुख दावेदार असलेल्या कॅनडाच्या ओंटारियो प्रांताने आर्थिक अडचणींमुळे बोली लावण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आता भारताकडे ही स्पर्धा खेचली जाण्याची शक्यता वाढली आहे.

कॉमनवेल्थ गेम्स फेडरेशननुसार, यजमानपदासाठी भारत, कॅनडा आणि नायजेरिया हे तीन संभाव्य इच्छुक देश होते. मात्र कॅनडाच्या 'युनायटेड कॅनडा' संयुक्त बोलीतील महत्त्वाचा भागधारक असलेल्या ओंटारियोच्या माघारीमुळे ही बोली धोक्यात आली आहे. कॅनेडियन माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, खर्च-लाभ विश्लेषणात ही स्पर्धा 'अव्यवहारी' ठरली आहे.

दरम्यान, भारत सरकार आणि गुजरात राज्याने २०३० राष्ट्रकुल स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी मोठा पुढाकार घेतला आहे. अहमदाबाद या शहराला यजमानपदासाठी केंद्रस्थानी ठेवण्यात आले असून, काही स्पर्धा इतर शहरांतही होऊ शकतात. या स्पर्धेचा उपयोग देश २०३६ ऑलिंपिकसाठी 'चाचणी खेळ' म्हणून करत आहे.

७ जून रोजी लंडनमध्ये केंद्रीय क्रीडा मंत्रालय, गुजरात सरकार आणि भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अधिकाऱ्यांनी राष्ट्रकुल क्रीडा महासंघाशी चर्चा केली. त्यानंतर राष्ट्रकुल अधिकाऱ्यांचा ऑगस्टमध्ये अहमदाबाद दौरा निश्चित करण्यात आला आहे. या दौऱ्यापूर्वी ३१ ऑगस्ट ही बोली सादरीकरणाची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

कॅनडाच्या हॅमिल्टन शहराने १९३० मध्ये पहिल्या ब्रिटिश एम्पायर गेम्सचे आयोजन केले होते. त्यामुळे २०३० मध्ये शंभराव्या वर्धापन दिनानिमित्त हे खेळ पुन्हा तिथे होणं अपेक्षित होतं. मात्र, ओंटारियो सरकारने मोठ्या खर्चामुळे माघार घेतल्यानंतर 'युनायटेड कॅनडा' ही बोलीच अनिश्चित झाली आहे. अल्बर्टा प्रांतानेही याआधीच आर्थिक कारणांमुळे यजमानपदाच्या स्पर्धेतून माघार घेतली होती.

कॉमनवेल्थ स्पोर्टला सादर करण्यात आलेल्या कॅनडाच्या अखेरच्या प्रस्तावात विद्यमान सुविधा वापरणे आणि कार्यक्रम विविध प्रांतांमध्ये विभागणे याचा समावेश होता. मात्र हा प्रस्ताव आता पुढे जात नाही, हे स्पष्ट होत आहे.

गेल्या काही स्पर्धांमध्ये राष्ट्रकुल संघाला यजमान मिळवण्यात सातत्याने अडचणी येत आहेत. २०२२ मध्ये डर्बन शहराने यजमानपद मिळवले होते, परंतु आर्थिक मर्यादांमुळे त्यांनी नंतर माघार घेतली. त्यानंतर बर्मिंगहॅमने अल्पावधीत आयोजन करून स्पर्धा वाचवली होती. २०२६ साठी व्हिक्टोरिया (ऑस्ट्रेलिया) राज्याने यजमानपद जिंकले होते, पण त्यांनीही त्यागपत्र दिले. सध्या ग्लासगोने पुढाकार घेतला असला तरी ती स्पर्धा केवळ १० खेळांपुरती मर्यादित असेल.

या पार्श्वभूमीवर, भारताची संभाव्यता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राष्ट्रकुल क्रीडा संघटनेचे अधिकारी ऑगस्टमध्ये अहमदाबादचा दौरा करतील, त्यानंतर औपचारिक बोली सादर केली जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, अहमदाबाद ऑगस्टमध्ये राष्ट्रकुल वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप आणि ऑक्टोबरमध्ये आशियाई जलतरण चॅम्पियनशिपचे आयोजन करणार आहे. त्यामुळे क्रीडा यजमानीचा अनुभव भारतासाठी अधिक भक्कम होणार आहे.जर हे यजमानपद भारताच्या पदरात पडले, तर २०१० दिल्ली स्पर्धेनंतर ही मोठी जबाबदारी पुन्हा मिळवण्याचा ऐतिहासिक क्षण ठरू शकेल

'आम्ही एकत्र हरतो, एकत्र जिंकतो' -गौतम गंभीर

लीड्स (इंग्लंड), दि. २५ :

इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या कसोटीत भारताचा ५ विकेट्सने पराभव झाल्यानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याने स्पष्ट शब्दांत कोणत्याही खेळाडूवर किंवा गटावर दोष टाकण्यास नकार दिला. पत्रकार परिषदेत गंभीरने खेळाडूंच्या कामगिरीबाबत घेतलेल्या स्पष्ट भूमिका चर्चेचा विषय ठरल्या.

भारताच्या खालच्या फळीतील फलंदाजांची खराब कामगिरी आणि संघातील काही स्टार खेळाडूंनी अपेक्षेनुसार कामगिरी न केल्याबद्दल विचारले असता गंभीर म्हणाला की, मी येथे बसून कोणावर बोट ठेवणार नाही. संघ म्हणून आम्ही एकत्र हरतो आणि एकत्रच जिंकतो.८ ते ११ क्रमांकावर खेळणाऱ्या खेळाडूंनी दोन्ही डावांमध्ये मिळून केवळ ९ धावा केल्या असल्या तरी, त्यांनी प्रयत्न केले नाहीत असं म्हणता येणार नाही. कधी कधी अपयश येतं, ते स्वाभाविक आहे. सर्वांना वाटलं होतं की आम्ही ५७०-५८० पर्यंत धावा करू शकतो, पण तसं झालं नाही.

शार्दुल ठाकूरने संपूर्ण सामन्यात केवळ दोन बळी घेतल्याबद्दल प्रश्न विचारला असता गंभीर म्हणाला, त्याला स्पेशालिस्ट गोलंदाज म्हणून नव्हे तर बॉलिंग ऑलराउंडर म्हणून संघात घेण्यात आले आहे. कधी कधी कर्णधार आपल्या प्रवृत्तीनुसार निर्णय घेतो.

रवींद्र जडेजाने चांगली गोलंदाजी केली, त्यामुळे त्याच्यावर अधिक विश्वास दाखवण्यात आला. शार्दुलने दोन महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या आणि त्यामुळे आम्ही सामन्यात पुन्हा परतू शकलो. त्यामुळे केवळ बळींच्या संख्येवरून एखाद्या खेळाडूच्या योगदानाचा न्याय करता येणार नाही, असेही त्याने स्पष्ट केले.

भारताचा नवोदित कसोटी कर्णधार शुभमन गिल याच्यावर पूर्ण विश्वास असल्याचेही गंभीरने सांगितले. पहिल्याच सामन्यात पराभव झाल्यानंतर गिलच्या नेतृत्व क्षमतेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते.

गंभीर म्हणाला , ही त्याची पहिली कसोटी होती. सुरुवातीला काही अडचणी असणं साहजिक आहे. पण त्याच्यात यशस्वी कर्णधार होण्यासाठी आवश्यक असलेले सर्व गुण आहेत. पहिल्या डावात त्याने केलेली फलंदाजी प्रेरणादायक होती. त्याला फक्त वेळ द्यावा लागेल.

कर्णधार होणं ही मोठी जबाबदारी आहे. फार थोड्यांना ही संधी मिळते. गिलमध्ये क्षमता आहे, आणि मला खात्री आहे की तो यातून शिकून अधिक मजबूत नेता म्हणून पुढे येईल, असाही विश्वास गौतम गंभीरने व्यक्त केला .

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २९४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 294 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .